जा.क्र.उमा-१/शिमा/वै.मा/कोवि/२१/ 20719-22
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
दिनांक :- 12 OCT 2021

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक,
संबंधित अनुदानित कनिष्ठ महाविदयालये कोल्हापूर विभाग.

विषय :- अनुदानित उच्च माध्यमिक शाळामध्ये दिनांक २/५/२०१२ ते दिनांक २९.६.२०१७ या कालावधीत नाहरकत प्रमाणपत्र न घेता पायाभूत पदावर नियुक्त केलेल्या शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता प्रस्तावातील त्रुटीपूर्तता करणेसाठी विशेष शिबिर आयोजित करणेबाबत

संदर्भ- १) मा.आमदार श्री.जयंत आसगावकर, विधान परिषद सदस्य पुणे विभाग शिक्षक मतदार संघ यांचे पत्र दिनांक २८.७.२०२१.
२) शिक्षण आयुक्तलय मध्यवर्ती इमारत महाराष्ट्र राज्य पुणे १ यांचे पत्र क्र.शिआ/२०२१/१०३३३/मा.आ.पत्रव्यवहार/आस्था क्र.१४४/३२१३ दिनांक १२.८.२०२१.
३) मा. शिक्षण संचालक , (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील पत्र क्र.शिक्षक/शिक्षकेतर /पा.प/७६७२/२०२१/२७२३ दि. ३१.८.२०२१.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की , या कार्यालयाने दिनांक २९,३०,३१ ऑगष्ट २०१९ रोजी विशेष शिबिर आयोजित केले होते. सदर शिबिरात दिनांक २ मे २०१२ नंतर पायाभूत पदावर नियुक्त्या केलेले एकूण ११२ वैयक्तिक मान्यता प्रस्ताव प्राप्त झाले होते.

सदर प्रस्तावाची छाननी करुन केवळ नाहरकत प्रमाणपत्र नसल्याची त्रुटी असलेले एकूण ५१ प्रस्तावांची यादी या कार्यालयाच्या ६ फेब्रुवारी २०२० या दिनांकास मा.शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक ) शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचेमार्फत शालेय शिक्षण मंत्रालयास सादर केली होती. सदरची यादीस शासनाकडून नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्याने त्यांच्या प्रस्तावास नियमानुसार मान्यता देण्यात आलेल्या आहेत. व उर्वरित साधारणतः ६१ प्रस्ताव त्रुटीपूर्तता झाली नसल्याने नस्तीबध्द करण्यात आले होते. सदरच्या नस्तीबध्द केलेल्या प्रस्तावांच्या त्रुटी पूर्तता जमा करुन घेण्यासाठी उपरोक्त संदर्भिय आदेशाने आदेशित केले असल्याने या कार्यालयाने दिनांक **२२.१०.२०२१** रोजी कार्यालयीन दिवशी व वेळेत **सौ. स.म.लोहिया ज्युनिअर कॉलेज पेटाळा खरी कॉर्नर कोल्हापूर** या ठिकाणी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर दिनांकास त्रुटी पूर्ततेसह उपस्थित रहावे.

तसेच दिनांक २९,३०,३१ ऑगष्ट २०१९ रोजी आयोजित केलेले विशेष शिबिर काही शिक्षकांना माहित नसल्याने त्यांचे प्रस्ताव सदर शिबिरामध्ये सादर करु शकले नाहीत. अशा संस्था / शाळांनीही वरील कालावधीत पायाभूत पदावर नियुक्त्या केल्या असतील त्यांनीही परीपूर्ण प्रस्ताव सदर दिनांकास सादर करावेत. सदर शिबीरावेळी परिपूर्ण प्रस्तावासह मुख्याध्यापक/उपप्राचार्य व लिपिक यांनी उपस्थित राहून प्रस्ताव सादर करावेत व त्याच दिवशी तपासून घ्यावेत.सदर प्रस्तावामध्ये असलेल्या त्रुटी त्याचवेळी लेखी/तोंडी सांगणेत येतील त्याची पूर्तता त्रुटी पूर्तता दिनांकासच करणे आवश्यक राहील.

सदर शिबीरासाठी आपणांस दिलेल्या नियोजनाप्रमाणेच दिलेल्या दिनांकास सकाळी ११.०० वाजेपर्यंत उपस्थित रहावे. उशीरा आलेल्या प्रस्तावाबाबत विचार केला जाणार नाही.

**ज्या कर्मचा-यांचे प्रस्ताव आहेत त्यांनी अथवा अन्य कर्मचारी/ व्यक्ती यांनी उपस्थित राहू नये.** असे उमेदवार उपस्थित राहीलेस त्यांचेवर व संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांचेवर कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**सदरचे प्रस्ताव या कार्यालयाचे वेबसाईटवर प्रसिध्द चेकलिस्ट, विहित प्रपत्रे, प्रतिज्ञापत्रे यानुसार प्रस्ताव सादर करावा.**

तसेच संबंधित शिक्षकांची वैयक्तिक मान्यतेबाबची माहिती या कार्यालयाचे वेबसाईट वर जोडणेत आलेल्या वैयक्तिक मान्यता ऑनलाईन फॉर्मवर भरणेत यावी व त्याची प्रत प्रस्तावासोबत सादर करावी.

(चेकलिस्टसाठी या कार्यालयाची वेबसाईट www.dydekop.org पहावी.)

Scanned with CamScanner

२/- उपरोक्त प्रमाणे वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव सादर करताना शासन निर्णय दि. ६/२/२०१२ मधील तरतूदी/अटी यांचे अवलोकन करुन व निकषानुसार योग्य असणारे तसेच मागासवर्ग आरक्षण कायद्यानुसार असलेले प्रस्तावच सादर करावेत. आरक्षण डावलून केलेल्या नियुक्तीच्या मान्यतेचे प्रस्ताव सादर करु नयेत. अन्यथा मागासवर्ग आरक्षण कायद्याचा भंग केल्याबाबत नियुक्ती प्राधिकारी म्हणून आपणावर कारवाई प्रस्तावित केली जाईल याची नोंद घ्यावी.

**मागासवर्ग आरक्षण नोंदवहीची शिक्षक संवर्गाची संपूर्ण रजिस्टरची अद्ययावत नोंदवही सादर करावी.**

(सत्यवान सोनवणे)
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत- माहितीस्तव सविनय सादर- १) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ३२

४) मा. आयुक्त, शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती शासकीय इमारत, पुणे १

५) मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे १

Scanned with CamScanner